**नियमित फौजदारी खटला क्र.१३४/२०१५**

**शासन वि. अंकूरकुमार**

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. खते निरीक्षक तथा कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती, देवणी यांनी खते नियंत्रण आदेश १९८५ चे नियम १९(अ)(क) च्या भंगाकरिता अत्यावश्यक वस्तू अधिनियमाचे कलम ३ व ७(अ)(i) व (ii) च्या गुन्ह्याकरिता आरोपी क्र.१ ते ३ विरुध्द फिर्याद दाखल केली. आरोपी क्र.३ हजर आहे व त्यांनी स्वतंत्र संपरिक्षा घेणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. परंतु आरोपी क्र.१ व २ नियमित गैरहजर आहे आणि प्रकरण गैरजमानती वॉरंट आणि जामीनदारास कारणे दाखवा नोटीस बजावणीकरिता प्रलंबित आहे. परंतु आरोपी क्र.१ व २ विरुध्द सदर वॉरंट आणि जामीनदारास सदर नोटीस वारंवार काढून सुध्दा ते बजावलेले नाही. पोलीस अहवाला प्रमाणे आरोपी क्र.१ व २ हे दिलेल्या पत्यावर आढळून येत नाहीत. त्यावरून हे निश्चित झाले की, आरोपी क्र.१ व २ हे सदर वॉरंटची बजावणी न व्हावी म्हणून स्वत:ला लपवून ठेवत आहेत आणि सदर प्रकरणाची संपरिक्षा टाळत आहेत. त्यामुळे प्रकरण विनाकारण व विनाप्रगती प्रलंबित आहे.

०२. सन्माननीय उच्च न्यायालय यांनी जुनी प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत आदेशित केलेले आहे. परंतु आरोपींच्या कृतीमुळे त्याच्या गैरहजेरीमध्ये प्रकरण आवश्यक पूर्तता केल्याशिवाय निकाली काढता येणार नाही. आरोपी हे संपरिक्षा टाळण्याच्या दृष्टीने स्वत:ला लपवून ठेवत असल्याने भविष्यात किंवा लगेच त्याच्याविरुध्द गैरजमानती वॉरंटची बजावणी होण्याची शक्यता किंवा ते हजर होण्याची शक्यता नाही. सबब सदर प्रकरणामध्ये त्यांना फरार घोषित करणे आवश्यक झाले. भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ८४ प्रमाणे आरोपीविरुद्ध जाहीरनामा प्रकट करणे योग्य ठरेल. सबब, मी खालील आदेश पारीत केला.

## <u>आदेश</u>

१) भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ८४ प्रमाणे आरोपी क्र.१ व २ विरुध्द जाहीरनामा प्रकट करावा.

२) खते निरीक्षक तथा कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती, देवणी यांनी आरोपी क्र.१ व २ विरुध्द जाहीरनामा राष्ट्रीय आणि स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रकट करावा.

३) पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे देवणी यांनी सदर वॉरंट, नोटीस आणि जाहीरनामा यांचे विहित कालावधीमध्ये बजावणी करावी.

४) आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.12.09 17:11:05 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – ०९–१२–२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**देवणी.**